**नि.दि.दावा क्र.८८/२०१२**
**निशाणी – ९६ वर पुढे**

**शपथवेर प्रतिवादीं क्र.०१ ते ०४ तर्फे साक्षीदार क्र.०१ चा जादा सरतपास**
**विधिज्ञ श्री. एम. व्ही. थोरात यांचेकडून**

०१. माझे शपथपत्र निशाणी क्र.९६ मधील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे.

जादा सरतपास पूर्ण.

**उलटतपास**

**वादी तर्फे विधिज्ञ श्री. ए. आर. लबडे यांचेकडूनः–**

०२. माझे शिक्षण इयत्ता ०३ री ते ०४ थी पर्यंत झालेले आहे. मौजे बाभुळगाव येथे मी जन्मापासुन रहात आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी शेती करतो. हे मला माहित नाही की, वाद मिळकती बाबत मोजणी झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादींच्या पश्चिमेला आमचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादींच्या व आमच्या क्षेत्राच्या मधून पूर्वीपासुन ओढा गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या क्षेत्राच्या बांधापासुन व आमच्या क्षेत्राच्या बांधापासुन मधोमध ओढा गेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर ओढ्यालगत वादीने त्याच्या क्षेत्रात विहीर खोदली आहे. हे म्हणणे खरे आहे की, विहीरीला चांगले पाणी लागल्यामुळे वादीचे क्षेत्र बागायती झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे व वादीचे क्षेत्र ओढ्याकडे उतारावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, ओढयाची खोली जमीनीपासुन ७ ते ८ फुट आहे. हे म्हणणे खरे आहे की, ओढ्याची लांबी आमच्या बांधापासुन वादीच्या बांधापर्यंत १०० फुट अंतराची आहे. हे म्हणणे खरे आहे की, ओढा हा नागमोडी वळनाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, ओढयातील पाण्याचा दबाव लगतच्या जमीनीला पडतो.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या शेतात ओढयालगत विहीर खोदली आहे. हे म्हणणे खरे नाही की, विहीरीचे डबर मी ओढयात टाकले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ओढ्यात डबर टाकल्यामुळे एक प्रकारे ओढयात अतिक्रमण केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अतिक्रमणामुळे ओढयाचा नैसर्गिक प्रवाह बदलला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ओढयाचा प्रवाह बदलल्यामुळे वादीच्या जमीनीची धूप होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रवाह

बदलल्यामुळे वादीच्या जमीनीचे व विहीरीचे नुकसान होत आहे. हे म्हणणे खरे नाही की, ओढयाचा प्रवाह बदलल्यामुळे वादीच्या जमीनीस धोका निर्माण झाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी विहीरीचे डबर ओढ्यात टाकुन ओढयाचा प्रवाह पूर्णपणे वादीच्या शेताकडे वळवून दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने मला वेळोवेळी पाण्याचा नैसर्गिक प्रवाह व्यवस्थित करण्या बाबत विनंती केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी वादीच्या विरुध्द महसूल न्यायालयात खोटी रस्ता केस दाखल केली होती. हे मला सांगता येणार नाही की, सदर रस्ता केस ला प्रांत साहेबांनी स्थगिती दिली होती.

०४. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१७४ आमचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१७४ मध्ये जाण्यासाठी जुना पश्चिम बाजुने घोटण ते पाथर्डी रोडला मिळणारा गट क्र.१५४ ते १७५ च्या बांधावरुन प्रतिवादींना रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ओढयात जे डबर टाकुन अडथळा केला आहे तो काढल्यास ओढयाचा प्रवाह सरळ होईल. हे म्हणणे खरे नाही की, वादींना त्रास देण्यासाठी जाणिवपूर्वक त्यात डबर टाकुन ओढ्याचा प्रवाह बदलला. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात मी खोटी कैफियत दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले असुन आज रोजी मी खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्विकृत,

VAISHALI SANJAY MORE

Digitally signed by VAISHALI SANJAY MORE
Date: 2025.12.08 13:44:34 +0530

दिनांकः– ०८/१२/२०२५

(वैशाली सं. मोरे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
शेवगांव.